पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** दिनांक :- १८/०१/२०२५

## लैंगिक अत्याचार करणा-या आरोपीतास आजन्म कारावासाची शिक्षा

---

दिनांक १८/०१/२०२५ रोजी नाशिक जिल्हा सत्र न्यायालयातील प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीमती घुले सो. यांचे न्यायालयात वणी पोलीस ठाणे गुरनं १८३/२०२४ भादवि कलम ३७६(२)(फ), ३७६(अ)(ब), सह लहान मुलांचे लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ चे कलम ४,६ प्रमाणे दाखल खटल्याची सुनावणी पुर्ण होवून सदर गुन्हयातील आरोपी नामे **रतन भास्कर गांगोडे,** वय १९ वर्षे, रा. चारोसे, ता. दिंडोरी, जि.नाशिक याचेविरूध्द आरोप सिध्द झाल्याने मा. न्यायालयाने सदर आरोपीतास भादवि कलम ३७६, सह लहान मुलांचे लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ अन्वये आजन्म कारवास व ५०,०००/- रू. दंड, दंड न भरल्यास ०१ वर्ष साधी कैद याप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.

सदरची घटना दि. १३ जुन २०२४ रोजी १७:३० वा. चे दरम्यान दिंडोरी तालुक्यातील चारोसे शिवारात घडली होती. सदर गुन्हयातील आरोपी नामे रतन भास्कर गांगोडे याने फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय २ वर्षे ८ महिने ही अंगणामध्ये इतर मुलांसोबत खेळत असतांना तिस गावाबाहेरील उसाचे शेतात घेवून जावून तिचेशी अंगलट करून अतीप्रसंग केला होता. सदर गुन्हयातील आरोपीस वणी पोलीसांनी ताब्यात घेवून अटक केली होती.

सदर प्रकरणामध्ये नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी कळवण विभाग श्री. किरणकुमार सुर्यवंशी यांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक श्री. सुनिल पाटील, वणी पो.स्टे. तसेच पोलीस उपनिरीक्षक विजया पवार, पोना २४३८ खांडवी यांनी नमुद गुन्हयामध्ये तांत्रिक व कौशल्यपुर्ण तपास करून यातील आरोपीत याचेविरोधात मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्रीमती लिना चव्हाण यांनी, तसेच पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा सुजित इंगळे यांनी काम पाहीले असून यातील आरोपीविरूध्द गुन्हा शाबीत झाला असुन त्यास आजन्म कारवास व ५०,०००/- रू. दंड, दंड न भरल्यास ०१ वर्ष साधी कैद याप्रमाणे शिक्षा झाली आहे.